शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर या संस्थेतील नव्याने निर्माण करावयाच्या ज्या पदांचे ग्रेड वेतन रु.७६००/- किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा पदांना मंत्रीमंडळाची मान्यता देणेबाबत..

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय क्रमांक : मान्यता-२०१४/(प्र.क्र.४१/१४)/तांशि-५,

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम काम रोड,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ११ एप्रिल, २०१८

संदर्भ :-१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.मान्यता-२०१४/ प्र.क्र.४१/तांशि-१, दिनांक २०/०६/२०१६.

२) वित्त विभाग उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनाक १९ मे, २०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.१९/१६/विसु-१, दि.२४/०५/२०१६.

प्रस्तावना :-

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर या संस्थेमध्ये सन २००७ पासून संगणक व विज्ञान अभियांत्रिकी व सन २०१० पासून स्थापत्य अभियांत्रिकी व अणुविद्युत आणि दूरसंचार अभियांत्रिकी असे ३ पदवी अभ्यासक्रम प्रत्येकी ६० प्रवेशक्षमतेने सुरू करण्यात आलेले आहेत. परंतु २००७ पासून तेथे अद्याप पदनिर्मिती झालेली नाही. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार तेथे आवश्यक ५३ शिक्षकीय पदे निर्माण करण्यास उच्च स्तरीय सचिव समितीने त्यांचे दिनांक १९/०५/२०१६ रोजी झालेल्या १०० व्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरून ५३ पदांच्या निर्मितीचे आदेश संदर्भ क्र. १ येथील दिनांक २० जून, २०१६ च्या आदेशांन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

उच्च स्तरीय सचिव समितीने त्यांचे दिनांक १९/०५/२०१६ रोजीचे इतिवृत्तात नवीन पदनिर्मितीच्या प्रस्तावामध्ये ग्रेड वेतन रु.७६००/- किंवा त्यापेक्षा जास्त वेतनाची पदे असतील असे प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी विभागाने सादर करण्याबाबत नमूद केले आहे.

उच्च स्तरीय सचिव समितीने त्यांचे दिनांक १९/०५/२०१६ रोजीचे बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर या संस्थेतील रु.७६००/- किंवा त्यापेक्षा अधिक ग्रेड वेतन असणारी एकूण २१ पदे निर्माण करण्यास मंत्रीमंडळाने दिनांक ८.०३.२०१८ रोजी मंत्रीमंडळाच्या झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे.

शासन निर्णय :-

उच्च स्तरीय सचिव समितीने त्यांचे दिनांक १९/०५/२०१६ रोजीचे बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार तसेच मंत्रीमंडळाने दिनांक ८.०३.२०१८ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार **शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर** या संस्थेतील रु.७६००/- किंवा त्यापेक्षा अधिक ग्रेड वेतन असणारी पुढील पदे निर्माण करण्यास शासन मान्यता प्राप्त झाली आहे.

अ.क्र.	पदनाम	सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी (रु.)	मान्यता देण्यात आलेल्या पदांची संख्या
१	प्राध्यापक, संगणक व विज्ञान अभि.	३७४०० - ६७०००, ग्रे.पे.१००००	२
२	सहयोगी प्राध्यापक, संगणक व विज्ञान अभि.	३७४०० - ६७०००, ग्रे.पे.९०००	५
३	प्राध्यापक, स्थापत्य अभि.	३७४०० - ६७०००, ग्रे.पे.१००००	१
४	सहयोगी प्राध्यापक, स्थापत्य अभि.	३७४०० - ६७०००, ग्रे.पे.९०००	४
५	प्राध्यापक, उपयोजित यंत्रशास्त्र	३७४०० - ६७०००, ग्रे.पे.१००००	१
६	सहयोगी प्राध्यापक, उपयोजित यंत्रशास्त्र	३७४०० - ६७०००, ग्रे.पे.९०००	१
७	प्राध्यापक, अणुविद्युत व दुरसंचार अभि.	३७४०० - ६७०००, ग्रे.पे.१००००	२
८	सहयोगी प्राध्यापक, अणुविद्युत व दुरसंचार अभि.	३७४०० - ६७०००, ग्रे.पे.९०००	५
		एकूण	२१

२. सदरहू पदे संदर्भ क्र. १ येथील दिनांक २०.०६.२०१६ च्या शासन निर्णयात समाविष्ट आहेत.

३. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर या संस्थेतील नव्याने निर्माण केलेल्या एकूण ५३ पदांच्या वेतनावरील खर्च खालील लेखाशिर्षातून भागविण्यात यावा. यासाठी आवश्यक अर्थसंकल्पीय तरतूद विधीमंडळाच्या पुढील अधिवेशनात विहित मार्गाने करण्यात यावी.

"मागणी क्र.डब्ल्यू-३, २२०३,

११२, अभियांत्रिकी/तंत्रशिक्षण महाविद्यालये व संस्था,

११२ (००) (०१) शासकीय अभियांत्रिकी व वास्तुशास्त्र महाविद्यालये (वसतीगृहासहीत) (अनिवार्य),

(२२०३ ०३२७)"

४. हे आदेश वित्त विभागाचे सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३९३/१८/व्यय-५, दिनांक ९.०४.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtgra.govt.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४१११५०२४५३७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Anil Raghunath Katkar

Digitally signed by Anil Raghunath Katkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3fec0b0f5c05dc9058175992109e62d3f5719b9dfb87a96579dc30c265d67ce, serialNumber=2356d82c73e8a0c7b6da68b6511197206b94720842cda576febebf84581fc52a, cn=Anil Raghunath Katkar
Date: 2018.04.11 15:06:19 +05'30'

(अ. र. काटकर)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर,
(संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मंबई-१/नागपूर-२,
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), मंबई-१/नागपूर-२,
६. निवासी लेखा परीक्षा, मुंबई,
७. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर,
१०. वित्त विभाग, व्यय-५/आपुक, मंत्रालय, मुंबई,

११. नियोजन विभाग/का.१४७१, मंत्रालय, मुंबई,

१२. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर, (संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),

१३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग/कार्यासन क्रमांक तांशि-१,३,४ मंत्रालय, मुंबई,

१४. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,

१५. मा.रा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,

१६. निवड नस्ती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग/तांशि-५.